# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २४ वा ❑ शनिवार दि.२२ फेब्रुवारी २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरच्या नावावर आर्थिक भुर्दंड!

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 📖 साहित्य

वाहनांना नवीन नंबर प्लेट लावण्याच्या नावावर सामान्य जनतेवर परत एकदा आर्थिक भुर्दंड लावल्या जात आहे. आधीच सामान्य जनता सरकारच्या विविध करांच्या ओझ्याखाली भरडली जात असताना परत एकदा सरकारने हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरच्या नावावर जबर कर वसूल करत आहे.

केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ आणि केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्रालयाच्या नियमानुसार १ एप्रिल २०१९ पासून उत्पादित होणाऱ्या सर्व नवीन वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (उच्च सुरक्षित नोंदणी क्रमांक पाटी) बसवण्याची तरतूद आहे. यामुळे वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करुन होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे शक्य होणार आहे. जर एचएसआरपी नंबर प्लेट बसवली नाही, तर मोठा आर्थिक दंड होऊ शकतो, असे आदेशात म्हटले आहे.

राज्य शासनाने १ एप्रिल २०१९ पुर्वी उत्पादित झालेल्या जुन्या नोंदणीकृत वाहनांना ही नंबर प्लेट बसविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार मुंबई मध्य प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व वाहनधारकांनी त्यांच्या वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातूनही सर्व वाहनांना ही नंबर प्लेट बसविणे अत्यावश्यक असून १ एप्रिल २०१९ पुर्वीच्या जुन्या वाहनांनाही हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) कार्यालयाच्या कार्यक्षेत्राकरिता रियल मेझॉन इंडिया लिमिटेड ही एजंसी निश्चित करण्यात आली आहे वाहनधारकांनी या पोर्टलवर बुकींग करुन अपॉईटमेंट घ्यावी आणि नंबर प्लेट बसवून घेण्यात यावी,असे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

हाय सिक्युरिटी नंबर प्लेट न बसविल्यास

वाहनांवर हाय सिक्युरिटी नंबर प्लेट न बसविल्यास वाहनाचे मालकी हस्तांतरण, पत्ता बदल, वित्त बोजा उतरविणे, चढविणे, दुय्यम आरसी, विमा अद्ययावत करणे इत्यादी कामकाज थांबविण्यात येतील येणार आहे. हाय सिक्युरीटी नंबर प्लेट नसलेली वाहने, बनावट हाय सिक्युरिटी नंबर प्लेट असलेली वाहने आदी वाहनांवर या कार्यालयाकडून भविष्यात दंडात्मक कारवाई होणार आहे.

देशभरातील वाहन उत्पादक कंपन्यांना १ एप्रिल २०१९ पासून नवीन वाहनांना देणे बंधनकारक करण्यात आले होते. यासंदर्भात केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने २०१८ मध्ये आदेश दिले होते. २०१९ पूर्वीच्या वाहनांसाठी हाय सिक्युरिटी नंबर प्लेटची आवश्यकता ठरविण्याचा अधिकार राज्य सरकारांना देण्यात आले होते. यामुळे दिल्ली आणि इतर काही राज्यांनी या निर्णयाची अंमलबजावणी केली होती. तर काही राज्यात लोकांनी याला विरोध केला.

मात्र, महाराष्ट्र राज्यात हाय सिक्युरिटी नंबर प्लेट लागू करण्यात आले नव्हते, परंतु आता राज्य परिवहन विभागाने या निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाली आहे.सर्व वाहनधारकांना ३१ मार्च २०२४ पर्यंत हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बसवणे ही सुरक्षा दृष्टीकोनातून महत्त्वाची आहे आणि त्यामुळे वाहनांची ओळख पटविणे सोपे होईल, असे परिवहन विभागाचे मानणे आहे.

हाय सिक्युरिटी नंबरप्लेट वाहनाच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी तयार केल्या आहेत. ही प्लेट होलोग्राम स्टिकरसह येते. त्यावर इंजिन आणि चेसिस क्रमांक लिहिलेला असतो आणि हा नंबर प्रेशर मशिनद्वारे लिहिला जातो. हाय सिक्युरिटी नंबर प्लेटचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, ती एकदा तुटली की पुन्हा जोडता येत नाही. यासोबतच ही प्लेट अगदी वेगळ्या पद्धतीने बनवली जाते. कोणीही त्याची कॉपी करून बनावट प्लेट बनवू शकत नाही. त्याची चोरी व गैरवापर करता येत नाही. एखाद्या वाहनाला अपघात झाला तर गाडीला लावलेली हाय सिक्युरिटी नंबरप्लेट वाहनाच्या मालकासह सर्व माहिती देते

## लक्षवेधी छायाचित्र....



इक शहंशाह ने बनवा के हसीं ताज–महल....

(छाया : संजय दारमवार, मुंबई)

# मराठी भाषेकडून राष्ट्राच्या सांस्कृतिक निर्माणाचे महान कार्य -प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

## राजधानीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे दिमाखात उद्घाटन

### संस्कृतीचे बलस्थान असणाऱ्या भाषेने माणसे जोडावी – संमेलन अध्यक्षा तारा भवाळकर

### स्वभाषेच्या अभिमानाची शिकवण छत्रपती शिवाजी महाराजांकडून – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



ज्योतिर्मय 📖 साहित्य

**नवी दिल्ली – भाषा केवळ संवादाचे माध्यम नसून ती संस्कृतीची संवाहक असते. भाषा समाजातच जन्मतात आणि समाजाच्या निर्मितीत मोठी भूमिका निभावतात. मराठी भाषेने महाराष्ट्रातीलच नव्हे देशातील अनेक महापुरूषांच्या विचारांना अभिव्यक्ती देऊन सांस्कृतिक निर्माणाचे महान कार्य केले आहे, असे गौरवोद्गार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज येथे काढले. भारतीय भाषांमध्ये कधीही वैरभाव नव्हता. येथील सर्व भाषांनी एकमेकांना समृद्ध केले असून भाषिक भेदांपासून दूर राहून भाषा संवर्धित करणे ही सर्वांची सामुहिक जबाबदारी असल्याचे आवाहनही प्रधानमंत्र्यांनी केले.**

नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संमेलनाचे स्वागताध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार, संमेलनाच्या नियोजित अध्यक्षा डॉ.तारा भवाळकर, मावळते अध्यक्ष डॉ.रवींद्र शोभणे, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा.उषा तांबे, कार्यवाह डॉ. उज्ज्वला मेहेंदळे , कोषाध्यक्ष प्रकाश पागे, संमेलनाचे निमंत्रक संजय नहार आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

साहित्य संमेलनासाठी आलेल्या सर्वांचे मराठीत स्वागत करून प्रधानमंत्री म्हणाले, मराठी साहित्य संमेलन एका भाषेपुरते मर्यादित नाही. त्यास स्वातंत्र्य संग्रामाचा गंध असून तो एक मोठा सांस्कृतिक वारसा आहे. १८७८ पासून देशातील अनेक महान व्यक्तींनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले. या परंपरेशी जोडेले जाण्याचा मला विशेष आनंद आहे. जागतिक मातृभाषा दिनाचे औचित्य साधून होत असलेले संमेलनाचे आयोजन प्रशंसनीय आहे. ज्ञानेश्वरांनी 'माझ्या मराठाचि बोलू कौतुके, अमृताते पैजा जिंके' असे म्हटले आहे. मराठी भाषेवर माझे खूप प्रेम आहे. मराठी भाषा शिकण्याचे प्रयत्न मी निरंतर करीत आहे. अशा मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचे काम पूर्ण करण्याची संधी मिळाल्याचे मला मोठे समाधान आहे, असेही श्री मोदी यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याला ३५० वर्ष, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे ३०० वे जयंती वर्ष आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या राज्यघटनेचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे केल्याच्या पार्श्वभुमीवर हे संमेलन होत आहे, असे सांगून पंतप्रधान म्हणाले, १०० वर्षापूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली होती. वेदापासून विवेकानंदांपर्यंत नव्या पिढीला पोहोचविण्याचा संस्कारयज्ञ या माध्यमातून चालविला जात आहे. संघाच्या माध्यमातून मराठी भाषा आणि परंपरेशी जोडले जाण्याची मला संधी मिळाली. मराठी एक परिपूर्ण भाषा असल्याचे स्पष्ट करताना प्रधानमंत्री म्हणाले, मराठीत शुरतेसोबतच वीरता देखील आहे, सौंदर्य आणि संवेदना दोन्ही आहेत, समानता आणि समरसता आहे, मराठीत अध्यात्म आणि आधुनिकताही आहे. शक्ती, भक्ती आणि युक्तीदेखील आहे. देशाला आध्यात्मिक ऊर्जेची गरज असतांना महाराष्ट्राच्या थोर संतांनी ऋषींचे ज्ञान मराठीत जनतेसमोर ठेवले. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, रामदास, संत गाडगे महाराज, तुकडोजी महाराज, गोरा कुंभार आदी अनेक संतांनी भक्ती आंदोलनाच्या माध्यमातून समाजाला नवी दिशा दिली. आधुनिक युगात ग. दि.माडगुळकर आणि सुधीर फडके यांच्या गीत रामायणाने समाजावर प्रभाव टाकला आहे.

गुलामीच्या शेकडो वर्षाच्या कालखंडात मराठी भाषा आक्रमणकर्त्यांपासून मुक्तीचा जयघोष बनली. छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज आणि बाजीराव पेशव्यांसारख्या वीरांनी शत्रूंना मागे सारले. स्वातंत्र्य संग्रामात वासुदेव बळवंत फडके, लोकमान्य टिळक, वीर सावरकरांनी इंग्रजांची झोप उडवली. मराठी साहित्याने देशप्रेमाची धारा प्रवाहीत झाली. या साहित्याने देशप्रेमाचा जागर केला, जनतेला नवी ऊर्जा दिली. अशा शब्दात मराठीची महती व्यक्त करून पंतप्रधान म्हणाले, मराठी साहित्याने समाजातील वंचित, शोषितांसाठी मुक्तीचे दरवाजे खुले करण्याचे कार्य केले. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षि कर्वे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक मराठी समाजसुधारकांनी नवा विचार देण्यचे कार्य केले. मराठी भाषेने समृद्ध दलित साहित्य देण्याचे कार्य केले. मराठी भाषेने प्राचीन विचारांसोबत विज्ञानही मांडले. महाराष्ट्राने प्रागतिक विचार स्विकारले. मुंबई देशाची आर्थिक राजधानी बनली आहे. मुंबईने मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीला पुढे नेले.

देशाची भाषिक विविधता आपल्या एकतेचा मजबूत आधार असून मराठी याचे उत्तम उदाहरण असल्याचे सांगताना प्रधानमंत्री म्हणाले, भाषा एखाद्या आईप्रमाणे मुलांना नवा विचार देते, विकासाशी जोडते, भेद करीत नाही. भाषेने माणूसकीच्या विचारांना अधिक व्यापक केले आहे. मराठीने इतर भाषेतून साहित्य स्विकारले आणि त्या भाषांनाही समृद्ध केले. अनेक चांगल्या रचनांचे मराठीत भाषांतर झाले आणि मराठीतीतील उत्तम साहित्याचे इतर भाषात भाषांतर झाले. भाषांनी स्वत: सोबत इतरांना समृद्ध केले. हा समरसतेचा प्रवाह आणखी पुढे नेण्याची गरज आहे.

मराठीसोबत सर्व प्रमुख भाषेतून उच्च शिक्षणाला प्राधान्य देण्यात येत आहे. महाराष्ट्रातील युवक आता मातृभाषेतून उच्च शिक्षण घेवू शिकेल, असे सांगून प्रधानमंत्री म्हणाले, साहित्य समजाचा आरसा असतो. त्यामुळे साहित्य संमेलन, साहित्यिक संस्थांची देशाच्या विकासात महत्वाची भूमिका आहे. मराठीतीत महान विभूतींनी स्थापन केलेले आदर्श आणखी पुढे नेण्याचे कार्य महामंडळ करेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. समाजमाध्यमांद्वारे मराठी साहित्यात योगदान देणाऱ्या युवकांना प्रोत्साहन द्यावे, युवकांच्या स्पर्धांचे आयोजन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर हे संमेलन दिल्लीत होणे ही सर्वांसाठी अभिमानाची बाब असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, जगभरातील मराठी माणसांचे स्वप्न या निमित्ताने पूर्ण झाले. परकीय आक्रमकांनी आपल्या भाषेला प्रदुषित करण्याचा प्रयत्न केल्यावर शिवाजी महाराजांनी राजकारभारात मराठीचा उपयोग करण्याचा निर्णय केला. सर्व फारसी, ऊर्दु शब्द वगळून मराठीचे शब्द आणण्याची परंपरा त्यांनीच सुरू केली. स्वभाषेचा अभिमान आणि आग्रह छत्रपती शिवाजी महाराजांकडूनच आपण शिकलो आहोत. संमेलन होत असलेल्या तालकटोरा स्टेडिअममध्ये १७३७ मध्ये मराठ्यांनी आपली छावणी लावून दिल्ली जिंकली होती. आता आमचा मराठी माणूस आपल्या विचारांनी दिल्ली जिंकणार आहे. विश्व मराठी संमेलनात पु.ल. देशपांडे म्हणाले होते, आपल्या मातृभाषेवर प्रेम करणाऱ्याला माया आणि वात्सल्य समजतं आणि तो दुसऱ्या भाषेवरही प्रेम करतो. मराठी भाषेने असे सर्वांना आपलेसे केले आहे. ती लोकभाषा होऊन, लोकसाहित्य निर्माण झाल्याने मराठी समृद्ध झाली. संतांनी मराठी भाषा अधिक समृद्ध केली. कला, साहित्य, संस्कृती मराठी माणसाच्या ठायी वसलेली आहे. त्यामुळेच वेगवेगळी साहित्य संमेलने महाराष्ट्रात होत असतात, त्यात बोली भाषांना स्थान मिळत असते. दिल्लीतील मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने मराठीची सेवा करण्याची संधी सर्वांना मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. हे अधिवेशन ऐतिहासिक ठरणार असल्याचे सांगून १०० वे अधिवेशनही भव्य स्वरुपात साजरे करण्यात येईल, असेही श्री.फडणवीस म्हणाले.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन विविध बोलींचे संमेलन आहे आणि पंतप्रधानांना भेट दिलेली विठ्ठलाची मूर्ती ही महाराष्ट्राच्या उदार संस्कृतीचे प्रतिक असल्याचे नमूद करून डॉ.तारा भवाळकर म्हणाल्या, मराठी भाषेचे महत्व संत ज्ञानेश्वर, संत एकनाथांनी मांडले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्य स्थापन करण्यापूर्वी संतांनी त्यासाठी पोषक भूमी तयार केली होती. मराठी भाषा संतांनी टिकवली. भाषा जीवनात असावी लागते. भाषा जैविक गोष्ट असून, ती बोलली तर जीवंत रहाते. महाराष्ट्राला पांडुरंगांचे स्मरण मराठीतून करायला लावणाऱ्या संतांनी मराठी जिवंत ठेवली. ज्या दिवशी आईने पहिली ओवी बाळासाठी म्हटली असेल त्या दिवशी मराठी भाषा जन्माला आली असेल. संतांनी विठ्ठलाशी संवाद साधतांना मराठी भाषेतून साधला. संत खऱ्या अर्थाने पुरोगामी विचाराचे होते. या सर्वांना मिळून मराठी भाषेचे अभिजातपण आले आहे. मराठी बोलीतून पसरली म्हणून शिवाजीमहाराजांना खेड्यापाड्यातून मावळे मिळाले. भाषा हे संस्कृतीचे बलस्थान असते. भाषा ही आपलेपण निर्माण करणारी, जोडणारी गोष्ट असली पाहिजे, तोडणारी नाही. संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड होण्यासाठी स्त्री असण्यापेक्षा गुणवत्त हा महत्वाचा आधार आहे. दिल्लीचे तख्त राखणारा महाराष्ट्र विचारातून, साहित्यातून जीवंत राहिला आहे. साहित्य संमेलनाच्या निमित्ताने प्रेमाचा संदेश दिला जावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर पहिलेच साहित्य संमेलन दिल्ली येथे होत असून त्याचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होत असल्याबद्दल विशेष आनंद असल्याचे सांगून श्री.पवार यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत घेतलेल्या भूमिकेबद्दल श्री. मोदी यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले, संत परंपरेपासूनच सर्वसमावेशक विचार मांडण्याचे काम मराठी साहित्यिकांनी सातत्याने केले. महिला साहित्यिकांच्या योगदानाने मराठी साहित्य समृद्ध झाले आहे. समाजाला मार्गदर्शन करण्याचे काम साहित्यिकांनी केले. साहित्यिकांची जबाबदारी वाढली असून समाजाला समाजसुधारकांच्या विधायक मार्गाने नेण्याचे काम साहित्यिकाने करण्याची आवश्यकता आहे. नव्या पिढीला पुस्तकांशी बांधून ठेवण्यासाठी नव्या माध्यमांचा कल्पकतेने वापर करायला हवा. नव्या पिढीमध्ये साहित्याची गोडी टिकून राहिली तरच साहित्याला भवितव्य असेल. महिलांना अध्यक्षपदाचा मान अधिकाधिक मिळाला तर महिला साहित्यिकांची परंपरा आणखी वेगाने पुढे जाईल. राजकारण आणि साहित्यातील संबंध पूर्वीपासून आहे, ते परस्पराला पूरक आहेत असेही श्री.पवार म्हणाले. श्री.नहार म्हणाले, दिल्लीतील साहित्य संमेलनाच्या माध्यमातून लेखणी आणि ग्रंथालयाचे महत्व पोहोचविणारे आहे. पंतप्रधानांच्या हस्ते संमेलनाचे होणारे उद्घाटन राज्याच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहिले जाईल. देशाच्या जडणघडणीत महाराष्ट्राच्या सकारात्मक भूमिकेची पायाभरणी करणारे हे संमेलन आहे. प्रास्ताविकात श्रीमती तांबे यांनी संमेलनाच्या आयोजनाविषयी माहिती दिली. मराठी मनाचं देशाच्या राजधानीशी असलेलं नातं जवळ आणणारं हे संमेलन असल्याचे त्यांनी सांगितले. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून आणि रुकय्या मकबूल यांच्या नवकार मंत्राने कार्यक्रमाची सुरुवात झाली. शमीमा अख्तर यांनी महाराष्ट्र गीत सादर केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमास केंद्रीय राज्य मंत्री प्रतापराव जाधव, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, लोकसभेचे माजी अध्यक्ष शिवराज पाटील चाकूरकर, विनय सहस्रबुद्धे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.



– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



आनंदी पहाट...


## साधी व्याधी बरबादी ठरू नये

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या प्रत्येकाला प्रकृतीची काळजी घेणं जरुरीचं असतं. त्यासाठी आवश्यक ती पथ्य पाळणे देखील आवश्यक असतं. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या व्यग्र आणि व्यस्त दिनक्रमांत आपण दीनदुबळ्या अवस्थेलाच निमंत्रित करत असतो, हे नेहमीच विसरतो, अथवा त्याची जाणीव आपल्याला त्यावेळी होत नाही. अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या तीनही गरजांची पूर्तता करण्यासाठी अर्थार्जन अनिवार्य असतं. दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस करून मिळवलेल्या पै पैशातून अन्न ग्रहण करणे काहीवेळा बाजूला राहतं, कारण अनेकदा ते दुर्लक्षित होतं. मुलभूत गरजांपैकी वस्त्र आणि निवारा ह्या दोन्ही गरजा महत्वाच्या असतातच पण त्याहीपेक्षा अधिक महत्वाची गरज म्हणजे अन्न होय. त्या अन्नाशिवाय कोणताही जीव जगूच शकत नाही. त्याची गरज शारीरिक स्वास्थ्यासाठी अधिक असते, आपल्या जगण्यासाठी असते.

गरम, स्निग्ध, योग्य मात्रेत, पहिलं अन्न पचल्यावर, मनाला आवडेल अशा ठिकाणी सर्व योग्य सामग्रीसह, फार भरभर नाही आणि हळूही नाही, असं न बोलता हसत आनंदी वातावरणांत, जेवणाकडे पूर्ण लक्ष देऊन अन्न घ्यावं. आपल्या पचनक्रियेसाठी, शारीरिक स्वास्थ्यासाठी ते अत्यंत महत्वाचं, म्हणूनच अधिक जरुरीचं असतं. सद्य:स्थितीत धावपळीच्या युगात वेळी अवेळी काम करत राहावे लागते. त्यामुळे जेवणाच्या वेळाही वारंवार बदलतात. हल्ली अनेकांचा कल फास्टफूड खाण्याकडे आहे. फास्टफूड खाल्ल्यामुळे उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोगाचे विराट, अतिवजन वाढणे, किडनीवर परिणाम होणे असे आजार उद्भवतात. ह्याची आपल्याला ते खाताना जाणीवच रहात नाही. एखादी साधीच व्याधी झाली तरीही ती जीवनाची बरबादी ठरू शकते.

## धन्यवाद हो धन्यवाद...




ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)


असं म्हटलं जातं की आपल्याला आयुष्यात जे काही मिळतं ते बऱ्याच वेळा आपल्या योग्यतेपेक्षा जास्त असतं. जो त्याबद्दल कृतज्ञ असतो, त्याला अधिकाधिक मिळत जाते. स्वामी विवेकानंद म्हणतात तुम्ही जसा विचार कराल, तसे तुम्ही घडता. तुम्ही स्वतःला शक्तिमान समजाल तर शक्तिवान व्हाल. स्वतःला दुर्बल समजाल तर तसेच व्हाल. म्हणून आपल्या आयुष्यातील नकारात्मक गोष्टींवर लक्ष केंद्रित न करता किंवा त्याबद्दल दैवाला दोष देत राहण्यापेक्षा आपल्याला मिळालेल्या चांगल्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करा. त्या गोष्टींवर लक्ष केंद्रित केल्यामुळे लॉ ऑफ अट्रॅक्शन च्या तत्वानुसार त्या गोष्टी तुमच्याकडे यायला सुरुवात होईल.




कृतज्ञता ही प्रेमाची सख्खी बहीण आहे. त्या दोन्ही हातात हात घालून चालतात. मुकी जनावरं सुद्धा किती कृतज्ञ असतात ! आपल्या मालकावर किती प्रेम करतात, त्याच्यासाठी जीव द्यायला तयार होतात. आपण तर सारासार विचार करू शकणारी माणसं आहोत. नटसम्राट मधील अप्पासाहेब बेलवलकर. म्हातारपणी आपली सगळी संपत्ती मुलांना वाटून टाकतात. पण मुले कृतघ्न निघतात. त्यांच्यावर नको नको तो आळ,संशय घेतात. शेवटी दोघे घराबाहेर पडतात. अप्पासाहेबाना शेवटी सांभाळतो तो एक साधा बूट पॉलिश करणारा मुलगा. मुलांना जेव्हा आपली चूक कळते तेव्हा वेळ निघून गेलेली असते. अमिताभ बच्चन आणि हेमा मालिनीचा बागबान हा चित्रपट अशाच कथानकावर आधारित आहे. जिथे कृतज्ञता, प्रेम संपले तिथे माणुसकी संपली.

म्हणूनच आपल्याला धन्यवाद द्यायचे आहेत आपल्याला इथपर्यंत पोहोचवणाऱ्या, आपल्याला हरघडी मदत करणाऱ्या सगळ्यांना. धन्यवाद द्यायचे आहेतते आपल्याला सगळे काही देणाऱ्या विधात्याला. आयुश्यात थोडं थांबून कृतज्ञतेच्या फुलांचा सुगंध अनुभवायलाच हवा. चांगुलपणाचे, कृतज्ञतेचे चक्र सदैव फिरत राहायला हवे.

**(क्रमश:)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## भक्तिनिरुपण

ज्योतिर्मय साहित्य

६)संत सहवासाने, आचाराने विचाराने जीवन जगावे.

७)समर्थाचे विचार किती प्रगल्भ होते की नुसतं देवदेव करत बसु नका, तर सर्व शास्त्रविद्येचा अभ्यास करा नवनवीन प्रयोग करा जाणते होऊन नरजन्माचा ऊपयोग चांगलाच करा असे सांगतात. तिर्थयात्रा करा,पापक्षय होण्यासाठी पुरश्चरणे करावी.

८)परोपकार करून ज्ञानमार्गाचा अवलंब करा .सारासार विचार करून भक्तिमार्ग अनुसरावा.

९)वेदांची आज्ञा पाळावी. आजच्या काळात हे फारच महत्त्वाचे विचार आहेत(कर्मकांड पाळावे) ऊपासना करावी म्हणजे ज्ञानप्राप्ती करण्याचा अधिकार व अंगी पात्रता निर्माण होते.

१०)भगवंत भक्ती करत असताना ती काया वाचा,मनाने निर्मळ मनाने करावी. पान फल, फळ यांचा वापर करावा.


११)जन्माला येऊन आत्महीत साधले नाही तर जगून देखील मरणा सारखेच असते. नाही तर जन्माला आला, जगला व ऐक दिवस गेला. हा देह फक्त भुईभार होण्यासाठी नको तर ईतरांच्या साठी हा देह झिजला पाहिजे. कर्म मग ते कोणतेही असो अगदी मन लाऊन केले तर आपली शक्ती जशी आहे तशी वापरली तर या नर देहाला मन वधन प्राप्त होते. म्हणून भगवत् भक्तित रमावे. जोडोनीया धन ऊत्तम व्यवहारे असे जीवनाकडे बघावे.

वरील प्रमाणे सदाचाराने जो वागत नाही. जिवंत असुन मेल्या सारखे वागतो.जन्म दात्या माता पित्यांना फक्त कष्टच देतो अशा माणसाचे वर्णन समर्थ पुढील प्रमाणे करतात.

तर नरदेह मिळाल्यावर कसे वागू नये याचे विवेचन समर्थ पुढे करतात. ते कसे ते आता पाहूया.

**(क्रमश:)**

## नामाचे प्रेम येण्यासाठी खरी कळकळ पाहिजे.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नामाचे प्रेम का येत नाही, हा प्रश्न बहुतेकजण विचारतात. पण थोडासा विचार केला तर असे लक्षात येईल की, हा प्रश्नच बरोबर नाही. मूल न झालेल्या बाईने, मुलाचे प्रेम कसे येईल ? असे विचारण्यासारखाच हा प्रश्न आहे. मूल झाले की प्रेम त्याच्याबरोबरच येत असते. तेव्हा मुलाचे प्रेम कसे येईल हा प्रश्न करण्याऐवजी मूल कसे होईल याचाच विचार करणे बरोबर ठरेल. आपणसुद्धा प्रश्न करायचाच असेल तर नामाचे प्रेम कसे येईल असा करण्याऐवजी, मुखी नाम कसे येईल असा प्रश्न करणे बरोबर होईल. मुखी नाम यायला वास्तविक आडकाठी कोणाची आहे ? दुसर्या कोणाचीही नसून आपली स्वत:चीच आहे. वास्तविक, एकदा नाम घ्यायचे ठरवून सुरूवात केली की झाले. पण तसे होत नसेल तर, दोष दुसर्या कोणाचा नसून आपला स्वत:चाच आहे. म्हणून नाम घेणे हे आपले काम आहे; मग त्याच्या पाठोपाठ येणे हा प्रेमाचा धर्मच आहे. जसे आईच्या बाबतीत, मूल आणि प्रेमाचा पान्हा ही निराळी असूच शकत नाहीत, तसे नाम आणि त्याचे प्रेम ही एकमेकांना सोडून राहूच शकत नाहीत. ह्यावरून एक गोष्ट अशी ठरली की, प्रेम का येत नाही, याचे उत्तर आमच्याजवळच आहे, आणि ते म्हणजे, नाम घेत नाही म्हणून. यावर कोणी असे म्हणेल की, आम्ही नाम घेतोच आहोत, तरीही प्रेम का येत नाही ? हे विचारणे ठीक. पण आता आम्ही जे नाम घेतो म्हणून म्हणतो, त्याचा विचार केला तर काय दिसेल ? पोटी जन्माला आलेल्या मुलाबद्दल जसा कळवळा असतो, तसा नामाबद्दल आपल्या ठिकाणी कळवळा नसतो. सर्व संतांनी किंवा आपल्या गुरूने, नाम घ्यावे असे सांगितल्यामुळे आपण ते घेतो, किंवा दुसरे काही करायला नाही म्हणून घेतो, इतकेच. अर्थात, तसे घेतले तरी आज ना उद्या आपले काम होईलच. पण प्रेम का येत नाही, असा प्रश्न विचारण्यापूर्वी, आपण नाम किती आस्थेने घेतो, हा प्रश्न स्वत:ला विचारणे जरूर आहे. एखाद्या बाईला फार दिवसांनी मूल झाले तर त्याच्याबाबतीत तिची जी स्थिती होते ती नामाच्या बाबतीत आपली होणे जरूर आहे. आपल्या देहाची वाढ जशी आपल्याला नकळत होते, तशी आपली पारमार्थिक उन्नतीही आपल्याला नकळत झाली पाहिजे. ती कळली तर सर्व फुकट जाण्याचा संभव असतो. परमार्थात मिळविण्यापेक्षा मिळविलेले टिकविणे, हेच जास्त कठीण आहे. ज्याला मी काही तरी झालो असे वाटते तो काहीच झालेला नसतो. अशा माणसाने फारच सांभाळले पाहिजे.

नवर्याला देव आवडत नाही म्हणून बायकोने नामस्मरण सोडण्याचे कारण नाही. तिने नाम घेतले तर धर्म सोडला असे न होता उलट संसार सुखाचा होईल.

***

संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

## मी एक असमंजस

ज्योतिर्मय साहित्य

माझा अजून एक मूर्खपणा सांगते. त्याच मॉर्निंग वॉक वरून परतत असताना मला एक वेगळाच छंद जडला आहे. ज्यांचे नळ चालू आहेत व पाणी वाया जात आहे ते बंद करायचे. ज्यांच्या पाण्याच्या टाक्या ओसंडून वहात आहेत त्यांना त्यांच्या घरात जाऊन सांगायचे व वाहणारे पाणी बंद करायला लावायचे. आणि रस्त्यावर वाहणाऱ्या नद्या बंद करायच्या म्हणजेच रस्ते स्वच्छ करणे थांबवायचे. आहे ना वेडेपणा? कारण आम्ही बिल भरतो, आमचा नळ आहे तुम्हाला काय करायचे आहे? अशी मुक्ताफळे ऐकून घ्यावी लागतात. तरी मी काही सुधारत नाही. याच पाण्या बाबत आमचा वेडेपणा सांगते. तर आम्ही काय करतो ते सांगते म्हणजे तुम्हाला पण पटेल. आम्ही डाळ, तांदूळ, भाज्या धुतलेले पाणी एका छोट्या बादलीत घेतो आणि ते कुंड्यातील झाडांना घालतो. कपडे धुतलेले पाणी सडा टाकायला वापरतो. कपडे पिळलेले पाणी संडास, बाथरुम धुवायला वापरतो.पाणी प्यायला देताना शक्यतो अर्धा ग्लास देतो. लागले तर पुन्हा देता येते. आणि तरीही उरलेच तर एका भांड्यात साठवतो. ते कुठेही वापरता येते. गाड्या नळीने न धुता अशा साठवलेल्या पाण्यातून धुणे/पुसणे करतो. पण पक्ष्यांना मात्र एका मोठ्या भांड्यात आवर्जून पाणी ठेवतो.

आहे ना वेडेपणा?

हीच गोष्ट लाईटची घराबाहेरील लाईट रात्र रात्र चालू असतात. बरे हे काम करायला रस्त्यावरील सरकारी दिवे चालू असतात. काहींच्या घरात संडास, बाथरुम यातील लाईट चोवीस तास चालू असतात. आपल्याला खटकले आणि विनंती करून सांगितले तरी उत्तर तेच मिळते. आम्ही बिल भरतो. आमच्या घरात किंवा बाहेर लाईट ठेवतो. तुम्हाला काय करायचे आहे? आम्ही मात्र प्रत्येकाच्या हाताला व मनाला सवय लावून घेतली आहे, ज्या खोलीतील काम होईल त्या खोलीतील लाईट बंद करायचे. आहे ना वेडेपणा?

एक असाच वेडेपणा नुकताच अनुभवला. मतदान करण्यासाठी सुट्टी मिळाली होती. शनिवार रविवार याला जोडून सुट्टी होती. म्हणजे उत्तम योग. आणि त्याचा फायदा उच्च विद्या विभूषित हुशार लोकांनी घेतला. मस्त जोडून रजा घेऊन छान थंड हवेची ठिकाणे गाठली की. आणि आमच्या वयाची काही मूर्ख माणसे ७/८ तास प्रवास करुन मतदानासाठी पोहोचली. आणि आमच्या सारखे कर्मचारी तर ऊन, तहान सगळे विसरून, स्वतःला होणारे त्रास विसरुन मतदान अधिकारी म्हणून काम करत होते. आहे ना मूर्खपणा?

असे बरेच वेडेपण आहे. जाता जाता अजून एक वेडेपणा सांगते. हल्ली मस्त रात्री केक कापून मोठ्या आवाजात गोंधळ करुन हॅपी बर्थडे साजरा करतात. केक तोंडाला फासतात. आम्ही मात्र वाढदिवस सकाळी साजरा करतो. सुवासिक अंघोळ घालतो. गोडाचे जेवण करतो. औक्षण करतो. देवळात जाऊन आशीर्वाद घेतो. एखाद्या संस्थेत त्या दिवशी जेवणाचा होणारा खर्च देतो. आहे ना वेडेपणा?

इतरांचे उच्च आवाजातील संगीत, डीजेचे व अपरात्री फटाक्यांचे आवाज ऐकणारे आम्ही. स्वतःच्या घरात कुलर लावताना त्याचा आवाज इतरांना त्रास देईल का? हा विचार करून आपला फॅन लावून झोपणारे आम्ही. आहोत ना वेडे?

तर मंडळी असे वेडेपणाचे बरेच किस्से आहेत. नमुना म्हणून काही सांगितले. आणि आपल्याच मंडळींचा सल्ला घ्यावे वाटले. म्हणून हा लेखन प्रपंच केला आहे.



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर


ज्योतिर्मय साहित्य

असन्तो नाभ्यर्थ्याः सुहृदपि न याच्यः कृशधनः
प्रिया न्याय्या वृत्तिर्मलिनमसुभङ्गेऽप्यसुकरम् ।
विपद्युच्चैः स्थेयं पदमनुविधेयं च महतां
सतां केनोद्दिष्टं विषममसिधाराव्रतमिदम् ।।

अर्थ – सज्जन लोक दुर्जनांकडे याचना करू शकत नाहीत. ज्याच्याकडे अल्पधन आहे, अशा मित्राकडेही मागू शकत नाहीत. प्रिय आणि न्यायपूर्ण आजीविकेनेच काम चालवायचे आहे. प्राणांतीही अनुचित कर्म करू शकत नाहीत. विपत्तीतही स्वाभिमानाने रहावे लागते. श्रेष्ठ जनांच्या मार्गाचे अनुसरण करून व्यवहार करावा लागतो. अशा तलवारीच्या पात्यावर चालण्याप्रमाणे कठिण व्रताचा उपदेश सज्जनांना कोणी केला असेल बरे?

सज्जनांचा जगण्याचा मार्ग म्हणजे तलवारीच्या पात्यावर चालण्यासारखा असतो. याचना न करता, कोणासही न फसविता, स्वाभिमानाचे संरक्षण करीत, श्रेष्ठ जनांच्या मार्गाचे अनुसरण करीत करीत ते आपला व्यवहार पार पाडीत असतात.

## आचरणात आणावे असे



ज्योतिर्मय साहित्य

शब्द...शोधला तर अर्थ आहे,वाढला तर कलह आहे.

शब्द... सोसला तर सांत्वन आहे,झेलला तर आज्ञा आहे, टाकला तर वजनदार आहे.

शब्द... अक्षय पण आहे आणि निशब्द पण आहे... हळवी असतात मने जी शब्दांनी मोडली जातात अन शब्द असतात जादुगार ज्यांनी माणसे जोडली जातात...

मन गुंतायला वेळ लागत नाही, मन तुटायलाही वेळ लागत नाही. वेळ लागतो तो गुंतलेल्या मनाला आवरायला आणि तुटलेल्या मनाला सावरायला. दगडात मूर्ती असतेच त्याचा फक्त नको असलेला भाग काढून टाकायचा असतो आणि मग ह्याच भावनेने माणसाकडे पहा माणसातही नको असलेला भाग दूर करायला शिका.

जेव्हा अडचणीत असाल तेव्हा प्रमाणिक रहा, जेंव्हा आर्थिक परिस्थिती चांगली असेल तेव्हा साधे रहा, जेव्हा एखादे पद किंवा अधिकार असेल तेव्हा विनयशिल रहा, जेव्हा अत्यंत रागात असाल तेव्हा शांत रहा.

उत्तम स्वभाव आणि प्रामाणिकपणा हे माणसाचे कधीही न संपणारे धन आहे.

मनमोकळ जगण आणि मनासारख जगण यातल अंतर कळाल की आयुष्याच्या वाटा या आभाळा सारख्या होतात

काही गोष्टी सोडून द्यायच्या असतात, सगळ्या धरून ठेवल्या की पसारा होतो, गोष्टीचाही आणि आयुष्याचाही.




## बेंबीमध्ये तेल घातल्याने कुठले फायदे होतात?

ज्योतिर्मय साहित्य

गुडघेदुखी , सर्दी-पडसे तसेच त्वचाविकार. यामुळे त्रस्त असाल तर रात्री झोपण्यापूर्वी बेंबीजवळ वेगवेगळ्या तेलांपैकी विशिष्ट तेल लावून झोपले तर अक्षरशः चमत्कारीक फायदे दिसतात. ही तेले नेहमी आपल्याकडे असतात. पण बेंबी मध्ये दोन तीन थेंब टाकून, बेंबीच्या जवळ फक्त दोन तीन थेंब लावून झोपल्यास बरेच विकार चुटकीसरशी दूर होऊ शकतात. मात्र कोणत्या तेलामुळे कोणते रोग बरे होतात त्याची माहिती फारशी कुणाला नसते.

१ सांधेदुखी असेल, ओठ फाटले असतील तर सरसोंचे (मोहरी)तेल घेऊन त्याचे दोन तीन थेंब बेंबीत टाकावेत, दोन थेंब बेंबीजवळ लावायचे. हा उपाय करताना थोडा चमत्कारीक वाटेल खरा, पण तो प्राचीन उपाय आहे. त्यामुळे सांधेदुखी आणि ओठ फाटने कायमचे बरे होईल.

२ सर्दी-पडसे तर कधीही होते. काहीही केलं तरी सर्दी बरी होत नाही. पण अशावेळी कापसाचा बोळा अल्कोहोलमध्ये बुडवून तो आपल्या बेंबीजवळ फिरवायचा. सर्दीपडशावर हा रामबाण इलाज आहे. करून पहाच एकदा. जुन्यातील जुनी सर्दीही या लहानशा उपायाने बरी होते.

३ मुलगी असो की मुलं तारुण्यात चेहऱ्यावर मुरुमे येणं ठरलेलं आहे. फार त्रास होतो त्यावेळी. पण या समस्येपासून वाचायचे असेल तर कडुलिंबाच्या तेलाचे काही थेंब बेंबीमध्ये टाकून थोडय़ा थेंबांनी बेंबीभोवती मालीश करा. यामुळे मुरुमे तर गायब होतीलच, पण त्याबरोबरच त्वचाही डागविरहीत आणि सुंदर दिसू लागेल.

४ चेहरा स्वच्छ, चकचकीत आणि सुंदर दिसण्यासाठी महिला धडपडतात. पण त्यावरही सोप्पा उपाय करून पाहा. बदामाच्या तेलाचे दोन तीन थेंब बेंबीत टाकून, काहीथेंब बेंबीभोवती लावून पहा. झटपट परिणाम दिसेल. चेहरा चमकदार दिसेलच, पण रंगही उजळेल.

५ एवढेच कशाला, प्रजनन क्षमता वाढवण्यासाठी खोबरेल तेलाचे दोन तीन थेंब बेंबीत टका, काही थेंब बेंबीजवळ लावून हळुवार हाताने मसाज करायचा. या उपायाने प्रजनन क्षमतेशी संबंधित कोणताही विकार असेल तर तो बरा होईल.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

६ त्वचा मुलायम होण्यासाठी बरेच प्रयत्न केले जातात. पण आरोग्यदायी आणि मुलायम त्वचा व्हावी असे वाटत असेल तर गावरान ,देशी गाईचे थोडेसे तूप घेऊन दोन तीन थेंब बेंबीत टाकून, काही थेंब बेंबीजवळ लावायचे. त्वचा अगदी छोटय़ा बाळासारखी मऊ होईल.





७ मूळव्याध, भगेंदर, गॅस, पोट गच्च राहणे, पोटात जडपणा असणे, पोट साफ न होणे, गुडघे दुखणे, हे कमी व्हावे यासाठी नाभीमध्ये एरंड तेल वापरल्यास खूपच फायदा होईल.

माणसाच्या शरीराच्या प्रत्येक अवयवाचे मूळ बेंबीशी संलग्न असते. त्यामुळे कोणत्याही आजारावर बेंबीजवळ थोडे तूप चोळले तरी चांगला उपाय ठरतो.

टिप – दररोज संध्याकाळी झोपतांना प्रथम २-३ थेंब तेल नाभीमध्ये टाकावेत. बोटाने थोडा मसाज देऊन परत २-३ थेंब टाकावेत आणि झोपून जावे.

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

रवींद्रनाथांच्या आश्रमात मोठ्या आनंदानं राहणारी ही ज्ञानी आणि थोर मंडळी म्हणजे ज्ञान वाटणाऱ्या पाणपोई होत्या. ज्याला कोणालाही काही हवं असेल, त्याच्याजवळ आपल्या ज्ञानाची ओंजळ ही मंडळी आनंदाने खुशाल रिकामी करत. मग ती व्यक्ती विद्यार्थी असो की प्राध्यापक किंवा तिथे असलेली कोणीही सामान्य व्यक्ती. शांतिनिकेतन, श्रीनिकेतन यात वावरणाऱ्या लोकांमध्ये कमालीचा साधेपणा होता. पण या साधेपणातही कमालीचा आनंद भरून राहिला होता. नृत्य, नाट्य, गीत, संगीत, विविध कला यांचा आनंद ही मंडळी घेत असत आणि दुसऱ्यालाही देत. रवींद्रनाथ जीवनातील सौंदर्याचे उपासक होते. त्यांनी साधेपणाच्या नावाखाली कधीही रुक्षता किंवा कोरडेपणा येऊ दिला नाही. सौंदर्याशी कधीही फारकत होऊ दिली नाही. सत्य, शिव आणि सुंदर ही तिन्ही मूल्ये तिथे हातात हात घालून चालत होती.

साधारणपणे आपला असा समज असतो की पैसा असेल तरच आपण सौंदर्यदृष्टी जोपासू शकतो. पण हा समज रवींद्रनाथांनी चुकीचा ठरवला. त्याचं एक सुंदर उदाहरण या ठिकाणी सांगितल्याशिवाय राहवत नाही. त्यांच्या शांतिनिकेतनमध्ये क्षितिमोहन सेन हे शिक्षक होते. ते अत्यंत विद्वान आणि संत साहित्याचे अभ्यासक होते. त्यांची मुलगी अमिता देखील याच शाळेत शिकत होती. आश्रमात विविध प्रसंगी होणाऱ्या कार्यक्रमांसाठी कलकत्त्याहून श्रीमंतांच्या मुली यायच्या. त्यांच्या अंगावर सोन्याचांदीचे मौल्यवान दागिने असायचे. ते पाहून अमिताला देखील आपल्याला सोन्याचे दागिने हवे असे वाटू लागले आणि आपले वडील क्षितिमोहन यांच्याकडे तिने तो हट्ट धरला. मुलीने लाडाने एखादा हट्ट केला आणि तो पुरवता येत नसेल तर पित्याच्या काळजाला किती वेदना होतात, हे अनुभवीच समजू शकतील. क्षितिमोहन यांनी अमिताला बाबा मोशाय यांच्याकडे जा म्हणून सांगितले. रवींद्रनाथांना सगळे बाबा मोशाय म्हणत असत.

सोन्याच्या दागिन्यांचा हट्ट करणाऱ्या लहानग्या अमिताला रवींद्रनाथांनी फुलांचे दागिने किती सुंदर असतात, त्यांचे रंग किती सुंदर आणि वेगवेगळे असतात आणि अंगावर सोन्यांच्या दागिन्यांपेक्षा ते किती शोभून दिसतील हे पटवून दिले. आश्रमात तर विविध प्रकारच्या फुलांची कमी नव्हतीच. त्यांनी फुलांचे सुंदर दागिने बनवून घेतले. अमिताने ते घातले. तिच्याबरोबरच आश्रमातील इतर मुलींनी देखील हे सुंदर, सुवासिक दागिने परिधान केले. जेव्हा कलकत्त्याहून श्रीमंतांच्या मुली सोन्याचे दागिने घालून आल्या, तेव्हा आश्रमातील या निसर्गकन्या फुलांच्या आभूषणात मोठ्या सुंदर दिसत होत्या. आता कलकत्त्याहून आलेल्या त्या मुलींनी देखील आपल्या आईवडिलांकडे आपल्याला तसे फुलांचे दागिने हवेत म्हणून हट्ट धरला. अशी होती रवींद्रनाथांची समजावून देण्याची पद्धत.

**(क्रमशः)**

# ऐ लडका पूल बांधेगा

**ज्योतिर्मय साहित्य**

मराठी म्हणी आणि वाक्प्रचारात कैक म्हणींपैकी एक म्हण आहे. ''गवयाचे पोर रडताना ही सुरात रडतं'' तसाच काहीसा अनुभव मी नुकताच घेतला तो माझ्याच घराच्या बांधकामा वरती.

बांधकाम क्षेत्रात सध्या बंगाल, छत्तीसगड, बिहार, उत्तरप्रदेश, राजस्थान या भागातील बरेच कामगार बिगारी, मिस्त्री, सिव्हिल कामासाठी आलेले पहायला मिळतात. पंधरा वीस वर्षापूर्वी पंढरपूरातीलच लोक या व्यवसायात होते. नंतर काही कर्नाटकातील बेळगाव वगैरे भागातील कामगार आले.या लोकांनी या व्यवसायात चांगलाच जम बसवला आहे.

हे कामगार काही एकटेच आलेले आहेत तर काही आपल्या कुटुंबासह आलेले आहेत. यातीलच एक कुटुंब माझ्या बांधकामावर वीट बांधकाम व गिलावा करण्यासाठी येत आहे. व्यास वर्मा व त्याची बायको भूमिका त्यांची मुले करण व छोटी रागिणी असं कुटुंब आहे. करण मुलगा चार पाच वर्षाचा आहे. पण खोर्याने कालविलेला माल पाटीत भरणे, वीटा उचलून देणे, छोट्या बहिणीला सांभाळणे, अशी खेळता खेळता कामे करतो.छोटी रागिणी थापी घेऊन सिमेंट वाळू कालवलेल्या मालावर सफापणे चालविते.

आज हे लिहिण्याचे कारण म्हणजे पडलेल्या सिमेंट ब्लॉकच्या विटा एकमेकांना जोडून मध्ये वाळूने भरून त्याने पूल बांधल्या सारखा करून त्यावर खेळण्यातील ट्रॅक्टर फिरवू लागला होता. म्हणून मिस्त्री व्यासला म्हटलं तू घर बांधतो आहे पोरगा पूल बांधणार दिसतोय. गवयाचे पोर तसं गवंड्याचे पोर थापी फिरवताना सुध्दा सफाईदार पणे फिरवत होते.

आपल्या आजी आजोबांच्या काळात किंवा स्वातंत्र्यपूर्व काळात शैक्षणिक सुधारणा होण्या अगोदर व्यवसाय हे घरा घरातून चालत,ग्रामोद्योग होते, बलुतेदारी होती. घरातील व्यवसाय परंपरेने



केले जात होते. त्यामुळे घरातच व्यवसायाचे बाळकडू, कसब, कौशल्ये मुलं लहानपणापासून प्राप्त करीत असत. दरवाजा खिडक्या नीट करणारा सुतारकाम करणारा माणूस आज चटकन भेटत नाही.आणि राजस्थानहून आलेले प्लायवूड शिवाय करत नाहीत अशी गत होते. पूर्वी घरातच व्यवसाय चालत असल्याने मुल आपोआप पाहून शिकत.मोठेपणी जणू त्यांच्या हातात जादू आहे असे वाटण्या इतपत कला, कसब, कौशल्ये ती मुले आत्मसात करून जीवनात यशस्वी होत असत. हे खरं जीवन शिक्षण होते.

करण हा लहान मुलगा ही असाच पुढे वडील व्यास वर्मा कडून बघून बघून ही कला आत्मसात करेल असे त्याच्या बाललीला वरुन वाटते.ही बंगाल छत्तीसगड वरुन आलेली मुलं दिवसभर बांधकाम साहित्यात जसे खडी, वाळू, सिमेंट, सळया, गिट्टी, रस्त्यावरच्या मातीत खेळत असतात. यांना कसलीच अॅलर्जी का होत नाही ? कालवलेल्या सिमेंट वाळूत फिरतात पण पायाला कसं काही होत नाही ? उन्हात थंडीत आईवडिला बरोबर कामावर असतात कसलाही त्रास यांना का होत नाही ? या उलट शहरी मुलांच्या आईबाबांच्या तोंडी इन्फेक्शन झालं अस काही तरी ऐकायला मिळते.

अरे स्कूल जाऐगा क्या?या माझ्या प्रश्नावर गप्प बसलेल्या करण पेक्षा त्याच्या आईनेच उत्तर दिले. बनेगा ना ओ इंजिनिअर बनेगा. आईच्या उत्तरात,मुलाचा उष:काल भाभड्या आईला दिसत होता. आजचा हा लेख तिला किंवा त्यांना मराठी असल्याने वाचता येईल की नाही, काही सांगता येत नाही. आले तर बरेच.पण यांचा वर्तमानपत्रात फोटो पाहून कसा आणि किती आनंद होईल काही माहिती नाही. पण मला नक्कीच आनंद होईल. जसा मी माझ्या ''पंढरीचे ज्ञात अज्ञात हिरे'' यातील एका लेखात पंढरीतील लहानपणापासून पाहिलेल्या गरीब भिकार्यांचा एक लेख आहे. तो वाचकांनी वाचल्यावर मला फोन आले.''अरे दत्ता तुझ्या लेखणीने भिकार्यांना सुध्दा प्रसिध्दी दिली'' अशा टिप्पणी मुळे जेवढा आनंद मला झाला. कदाचित त्या ही पेक्षा जास्त आनंद या कामगार कुटुंबाला होईल यात शंका नाही.



दत्ता तरलगट्टी

# जीवनातला आनंद आणि ब्रह्मानंद

**ज्योतिर्मय साहित्य**

आपलं जीवन जगत असताना माणसाला दूसरीकडे आनंद शोधायला जायची काहीच गरज नाही. स्वतःचा आनंद माणसाला स्वतःच मिळविता येतो. त्यासाठी कुणाकडे हात पसरायचीही आवश्यकता नाही. तसेच, आनंद विकतही मिळत नसतो. कोणी म्हणेल की, आम्ही सिनेमा पाहून, हॉटेलिंग करुन, वस्तूंची खरेदी करुन तसेच पर्यटनाला जावून आनंद मिळवतो. पण, पैसे देवून मिळविता येणारा आनंद हा खरा आनंदच नसतो. तो आनंदाचा दिखावा असतो. तुम्हाला वाटणारा तो आनंद

तात्कालिक स्वरुपाचा आनंद असतो. त्यामुळे, तो खरा आनंद नसतो. खरा आनंद आपल्या अवतीभोवतीच असतो. फक्त तो



मधुकर निलेगावकर,
पुणे

शोधता आला पाहिजे. खरा आनंद एकदूस-याला मदत करण्यात, प्रेमाने व आपुलकीने संवाद साधण्यात असतो. त्यामुळे, माणसाच्या मनाला

खूप आनंद मिळत असतो. स्वतःची कला जोपासण्यात स्वतःचा छंद जोपासण्यावत खरा आनंद असतो. मग ते संगीतातील गायन असो, वाद्यवादन असो की, साहित्यातील काव्यगायन असो , काव्यवाचन असो की कथाकथन असो माणसाला स्वतःला व इतरांना मनसोक्त व मनमुराद असा निर्भेळ आनंद मिळत असतो. जीवनात सुखी असताना माणूस आनंदी असतो. पण, दू:ख आले की, माणूस निराश होतो. दू:खी होतो. मग, तो स्वतःला आणि इतरांना दोष देवू लागतो. काही काही माणसं अशी असतात की, ती स्वतःला दोष न देता इतरांनाच दोष देतात. काही जण तर याहीपलिकडे जावून देवालाच दोष



देतात. आपल्या दू:खाचं स्वतःच्या दूष्कर्मांचं खापर देवाच्या माथी मारण्याचा प्रयत्न करतात. सुख असो की दू:ख असो माणसाने नेहमी आनंदी राहीलं पाहिजे. म्हणजेचं माणसाला दू:ख, वेदना यापासून दूर राहिल्यास आनंद मिळतो किंवा मिळू शकतो. माणसाला खरा मिळविण्याचा एक सर्वोत्तम मार्ग म्हणजे भगवंताचे नामस्मरण आहे. नामस्मरणाने मिळणारा आनंद अविनाशी, अद्वितीय असतो.

# मुलांचे रंजन करणाऱ्या कथा चिंटू अस्वल आणि त्याचे घर

**ज्योतिर्मय साहित्य**

मुलांच्या भाषेत लिहिणं तसं कठीण. सोप असतं तेच अवघड असत असं म्हणतात. रवींद्र जवादे यांचा चिंटू अस्वल आणि त्याचे घर या पुस्तकाने मुलांची नाडी ओळखून त्यांच्या भाषेत लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. एकूण सहा कथा या पुस्तकात आहेत वेगळ्या धाटणीच्या या कथा आहेत. यात जंगल आहे. नदी आहे, पूर आहे तसंच अद्भुत अशी परिकथा देखील आहे.

मुलांना गुंग करणाऱ्या या कथा आहेत. संपूर्ण पुस्तक ग्लेझ कागदावर छापले आहे. सतत होणारी जंगलात येणारे वादळ पशुपक्षाचे घरटे उद्ध्वस्त करते. त्यांची वसाहतच नष्ट होते. मग त्यांना दुसरा सहारा शोधावा लागतो. चिंटू अस्वलाचे दोस्त असतात, त्यांची घरेही असतात परंतु या संकटकाळात त्याला कुणीही घरी घेत नाही. चिंटून नवीन जंगलात महत्प्रयासानं घरटं तयार केलं. तिकडं भयंकर पडलेल्या दुष्काळात सगळी वाताहत होते. सगळे प्राणी नवीन निवाऱ्याच्या शोधात जातात. चिंटूच्या घराकडे जाण्याचा विचार करतात. तेथे त्यांना पाटी दिसते या घरात सर्वांचे स्वागत. सगळे प्राणी खजील होतात. तात्पर्य संकटकाळी मित्रांना विसरू नये त्यांना आसरा द्यावा.

**पुस्तक परीक्षण**

प्रकाश रामचंद्र क्षीरसागर
९०११०८२२९९

पूर ही कथा एकमेका साह्य करू हेच सुचवते. पाण्यात पडलेल्या शुभमला वाचविण्यासाठी नितीनची धडपड सुरू असते. पुराचे पाणी काही उतरत नाही. काठावरची माणसेही त्यांना वाचवण्याचा प्रयत्न करतात. त्या भीषण पुरातून नितीनने शुभमला वाचवले ही धाडस कथा आहे.

प्रवेश निषेध ही कथा जंगल वाचवा प्राणी वाचवा असा संदेश देते. प्राणीसभा माणसांचा निषेध करते. माणसांच्या या गैरकृत्याचा निषेध करणारी ती सभा असते. यांत्रिक कुऱ्हाडीच्या साह्याने सर्व झाडे कापली जातात. हरणं आणि वाघ त्या माणसाच्या कचाट्यातून निसटतात. नदीचे पाणी भरण्याचा प्रकल्प आणि पात्रातील दूषित पाण्यामुळे भयभीत झालेले प्राणी सैरावैरा होतात. अखेर जंगलाच्या प्रवेशव्दारावर प्रवेश निषेध माणसांना जंगलात प्रवेश नाही अशी पाटीच लावली. माणसांच्या वागणुकीला प्राणीदेखील कंटाळून जातात.





चारुलता शाळेत जाते ही कथा सर्वांसाठी प्रेरक आहे. तिचे शिक्षक तिच्या शाळेचा खर्च करतात.चारुलताचे साहस आणि तिची कुणालाही मदतीची तयारी हे गुण सर्वांसाठी आवडणारे आहेत. तिला झाडांचे वेड आहे. एकदा रमाआजी आजारी असताना चारुलताचे आजीला दवाखान्यात नेणे आणि घरी पोहोचविणे हे गुणही प्रेरणादायी आहेत,

डिनो पोपट माणसाळलेला आहे. तो शिव्याही देतो. अपघातात सापडल्यावरही मदत करणाऱ्या प्रभाकररावांचाही चावा घेतो. त्या माणसाची मुले आल्यावर त्यांनीच त्या पोपटाला पिंजऱ्यातून बाहेर सोडल्याचे समजते. आपल्या आनंदासाठी कुणालाही कोंडून ठेवणे बरोबर नाही. हा संदेश ही कथा देते.

जादूचा कंपास ही कथा चांगल्या इच्छा पूर्ण करणाऱ्या कंपासची आहे. दुष्ट मुलगा हा कंपास तोडून मोडून टाकतो. स्वतःसाठी काहीही मागू नये, अवाजवी इच्छा मागू नये. स्वार्थ साधू नये असा संदेश ही कथा देते.

पुस्तकाचे मुखपृष्ठ आकर्षक आहे. कथांना पूरक अशी चित्रे आहेत. एकूण वाचनीय असे हे पुस्तक आहे.

चिंटू अस्वल आणि त्याचे घर
रवींद्र जवादे
पृष्ठे २००, मूल्य ४०
परिस प्रकाशन
सासवड, पुणे



# कदम बिर्याणी हाऊस

**ज्योतिर्मय साहित्य**

माझे मित्र शिवाजी बबनराव कदम यांचा १३ फेब्रु २०२५ ला मला फोन आला कि, ‘कदम बिर्याणी या हॉटेलचे स्ववास्तूत स्थलांतर करतोय.देवी चौक बस स्टॉप शेजारी किलबिल किड्स वेअर च्या जागी आता हॉटेल चालू होतेय. ‘कदम बिर्याणी हॉटेलचे उद्घाटन करण्यासाठी कूपर कॉर्पोरेशन प्रा.लि. चे चेअरमन आणि मॅनेजीज डायरेक्टर फारूख कूपर येणार आहेत.सूत्रसंचालन तुम्ही करा. शिवाजी कदम यांचे किलबील किड्स वेअर हे कपड्याचे दुकान.पण... हॉटेल व्यवसायात ते आहेत याची मला कल्पनाच नव्हती. मी पॅलेस स्ट्रीटवरून जाताना कदम बिर्याणी हाऊस चा बोर्ड आणि हॉटेल कन्याशाळेसमोर गेली दीड वर्षे बघत होतो. सूत्रसंचालन करण्याच्या आमंत्रणामुळे माझी ट्यूब एकदम पेटली... अरे हे आपल्या ज्येष्ठ मित्र बबनराव कदम यांच्या फॅमिलीचे आहे तर ! शुक्रवार दिनांक १४ फेब्रुवारीला, विशेषतः आपुलकीने उद्घाटनाला आलेल्या फारूख कूपर यांनी व्यक्त केलेले मनोगत कदम बिर्याणी या हॉटेलच्या ब्रँडची महती विशद करून गेले. फारुख कूपर म्हणाले... काही वर्षापूर्वी मी मटण बिर्याणी साताऱ्यात कोठे चांगली मिळते असे विचारले असता... मला कदम यांचे नाव समजले. त्यांना फोन करून मटण बिर्याणीची ऑर्डर दिली. मटण बिर्याणी आम्ही सर्व कुटुंबानी खाल्ली आणि आमचे कुटुंबच नव्हे तर, सर्व कूपर इंडस्ट्रीज कदम बिर्याणी या कदम कुटुंबियांच्या हॉटेलच्या खाद्य प्रकारच्या प्रेमात पडली.आमच्या कूपर इंडस्ट्रीज मध्ये परदेशी गेस्ट आले तरी, आम्ही कदमांच्याकडे मटण बिर्याणी ऑर्डर करतो आणि परदेशी पाहुणे खुष तर होतातच, पण पुन्हा जेव्हा येतात तेव्हा आठवणीने या बिर्याणीची आठवण काढून जेवणासाठी पुन्हा कदम बिर्याणी हॉटेलच्या बिर्याणीचीच मागणी करतात. कूपर पुढे म्हणाले... हा व्यवसाय तुम्ही ब्रँड म्हणून वाढवा. ठिकठिकाणी कदम बिर्याणी हॉटेलच्या फ्रॅन्चाइझ द्या. मी प्रत्येक ठिकाणी तुमच्या हॉटेलची जाहिरात करीत असतो. आत्तापर्यंत कमीतकमी ५०० किलो बिर्याणी तरी कूपर फॅमिली आणि इंडस्ट्रीजने फस्त केली आहे. ते पुढे हसत हसत म्हणाले... आमचे नाव सांगून तुमच्याकडे बिर्याणीची मागणी लोक करतात ना? आतापर्यंत त्यावरील कमीशन कधी देणार?. शक्यतो समारंभाला जाण्याचे टाळणारे फारूख कूपर यांनी येऊन उद्घाटन करून कदम बिर्याणी हॉटेलची महती नुसत्या सातारकरांनाच नव्हे तर महाराष्ट्रभर आपल्या मनोगताने सांगितली. सातारी कंदी पेढ्यासारखेच, साताऱ्याच्या या कदम बिर्याणी हॉटेलने आपला मटण-चिकन प्रकारातील वेगवेगळ्या खाद्य प्रकारच्या डिशेशचा ब्रँड विकसीत केला आहे.

परंपरागत हॉटेल व्यवसाय नसलेल्या कदम कुटुंबीयातील प्रमोद बबनराव कदम यांना याचे विशेष श्रेय जाते. प्रमोद कदम यांना पहिल्या पासूनच विविध खाद्य प्रकार बनविण्याची आवड. यातच त्याला त्याची पत्नी हर्षदा कदम यांची तसेच वहिनी सोनल शिवाजी कदम यांची साथ मिळाली. गेल्या १५ वर्षापासून ऑर्डरप्रमाणे शनिवार पेठेतील घरातूनच त्यांनी मटण-चिकन यांचे विविध प्रकार नागरीकांना घरपोच देण्यास सुरवात केली. स्वतः आपल्या पध्दतीने विकसित केलेले घरगुती मसाले, वेगवेगळे पदार्थ करीत असताना प्रयोगातून शिकत मिळविलेले ज्ञान, अनोखी स्वयंपाक शैली, काही वर्षांच्या अनुभवातून आलेला आत्मविश्वास अशातूनच सातारच्या प्रमोद कदम या तरुण व्यावसायिकाने कदम बिर्याणी हॉटेलचा बँड विकसीत केला. त्याच्या धडपडीला कुटुंबियांनी समर्थ साथ दिल्याने, आता या ब्रँड चे पदार्थ जसे लोक हैद्राबादला गेल्यावर तेथून हैद्राबादी बिर्याणी घेऊन येतात त्याप्रमाणे साता-याहून कदम बिर्याणी हॉटेलची बिर्याणी व



इतर पार्सल घेऊन जातात. प्रथमतः घरगुती कदम बिर्याणी’ हॉटेलचा व्यवसाय करीत असताना नक्षत्राच्या खाद्य मेळाव्यात जिल्हा परिषद मैदानात कदम कुटुंबियांनी आपला स्टॉल लावला. या स्टॉलवरील विविध उत्तम खाद्य पदार्थांमुळे त्यांना मिळणाऱ्या ऑर्डर्स वाढल्या. हळूहळू घरगुती असणारा हा हॉटेलचा व्याप कदम कुटुंबियांना हॉटेल व्यवसाय मोठ्या प्रमाणात करण्यास आत्मविश्वास देऊन गेला. आणि आज कदम बिर्याणी हॉटेल साताऱ्यात प्रसिद्ध आहे. पार्सल सर्व्हिस हा त्यांचा व्यवसाय विशेषतत्वाने मोठ्या प्रमाणात आहे.

गजवडी-परळीचे बबनराव कदम यांचे कुटुंब साताऱ्यात नोकरीच्या निमित्ताने आले. भूविकास बँकेत नोकरीला असणारे बबनराव यांनी शेती आणि नोकरी करीत आपल्या शिवाजी, मनोज आणि प्रमोद या मुलांना शिक्षण दिले. त्यावेळचा भूविकास बँकेतील सेवकांना पगार अत्यंत तुटपुंजे असे होते. माझे मित्र अशोक काळे यांच्यामुळे १९८५ पासूनच माझा वावर भूविकास बँकेत होता. विशेषतः १९९१ च्या नगरपालिका निवडणुकीत मला निवडून आणण्यासाठी कदम कुटुंबियांनी मला साथ दिली. प्रमोद कदम हे दि कराड अर्बन को-ऑप. बँकेमध्ये ऑफिसर म्हणून सेवा देत आहेत. माझे मित्र शिवाजी कदम हे दि. युनायटेड वेस्टन बँकेत पिग्मी एजंट होते. त्यानंतर त्यांनी सैनिक सहकारी बँक तसेच पार्श्वनाथ नागरी सहकारी पतसंस्थेत पिग्मी गोळा करण्याचे काम केले. शिवाजी कदम उद्योगप्रिय असल्याने त्यांनी कपड्याचा सेल लावणे हा उद्योग करीत करीत राजलक्ष्मी टॉकीजशेजारी एक कपड्याच्या व्यवसायासाठी गाळा बुक केला. त्याकाळात ५१,०००/- रुपये गाळा बुक करण्यासाठी आवश्यक होते. त्यासाठी शिवाजी कदम यांचे वडील बबनराव कदम यांनी आपली सर्व ताकद लावून त्यांना मदत केली. साधारण ८ लाख रुपयांचा हा गाळा बँकेच्या कर्जाने त्यांनी मिळविला आणि किलबील किड्स वेअर दुकान चालू केले. शेजारील दुकानही नंतरच्या काळात साधारण २० लाख रुपये देऊन खरेदी केले. रेडीमेड व्यवसायातील स्पर्धेमुळे आणि कदम बिर्याणी हॉटेलचा ब्रँड विकसीत झाल्याने याच ठिकाणी रेडिमेड कापडाचा व्यवसाय बंद करून आता हे हॉटेल सुसज्ज करून स्ववास्तूत कदम कुटुंबीयांनी चालू केले आहे. कदम कुटुंबियांची एकत्र कुटुंब हीच मोठी ताकद आहे. प्रमोद कदम, यास सर्व कुटुंबियांनी साथ दिल्याने, कष्ट घेतल्याने त्यांचा कदम बिर्याणी हॉटेल हा ब्रँड सातारकरांचा आवडीचा झाला आहे. विशेषतः कदम कुटुंबीयातील शिवाजी कदम हा ज्येष्ठ असल्याने सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचे कसब तसेच आपल्या भावाच्या सर्व कल्पनांना उचलून धरणे हेही तितकेच महत्वाचे. शिवाजी कदम यांची मुलगी शिवानी कदम हिची २०२३ साली मास्टर्स इन फिजीओथेरपी साठी लंडन येथील कार्डिक युनिव्हर्सिटी मध्ये निवड झाली.



शिरीष चिटणीस

शिवानीला इंग्लंडमध्ये लंडन येथे उच्च शिक्षणासाठी पाठविण्यासाठी कदम कुटुंबिय एकवटले. पैशाची तरतुद कर्जरूपाने आणि स्वतः करीत ती आता लंडनमध्ये शिक्षण घेत आहे. माझ्या एम.आय.डी.सी. मधील लोकमंगल माध्यमिक शाळेत तीचा सत्कार आम्ही आयोजित केला होता. फिजीओथेरपी मध्ये मास्टर्स करता येते याची मलाही माहिती नव्हती. शिवानीने आपल्या मनोगताने विशेषतः ८वी, ९वी, १०वी च्या विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये आलेल्या नवनवीन कोर्सची माहिती सांगून, शिक्षण हेच तुमचे ध्येय असले पाहिजे, असे सांगितले. तसेच स्वतः यासाठी घेतलेल्या कष्टाची माहिती देत विद्यार्थी दशेत अभ्यास कसा करावा यांचे विवेचन केले. कार्यक्रम संपल्यावर शिवानीच्या भोवती विद्यार्थ्यांचा गराडा आणि तिच्याबरोबर फोटो काढण्यासाठीची अहमहिका मला भावली.विशेषत: विद्यार्थ्यांचे भाषण विद्यार्थ्यांना ध्येयाकडे नेण्यास जास्त उपयोगी पडते. माजी विद्यार्थी जेव्हा शाळेत येतात आणि त्यांनी करीअर कसे घडविले ते सांगतात तेव्हा विद्यार्थ्यांच्यातील आत्मविश्वास वाढतो आणि त्यांना प्रेरणा मिळते. आपणही असे मोठे होऊ शकतो ही भावना त्यांचे आत्मबल वाढविते. कदम कुटुंबीयांचा आदर्श सातारकरांसाठी प्रेरणादायी आहे.

या कार्यक्रमास माजी नगरसेवक आणि जनता बँकेचे संचालक जयवंत भोसले, जनता सहकारी बँकेचे चेअरमन अमोल मोहिते, माजी नगरसेवक अल्लाउद्दीन शेख, भालचंद्र निकम, सागर पावशे आणि इतर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जाणून श्रमाची महती चालत गेलो
ध्येयासक्तीचे विशाल नभ जोडीला
हातात हात घालून दिशाही आल्या
जगण्याचा बहुरंगी उत्सव झाला.

असे प्रमोद कदम,शिवाजी कदम आणि त्यांच्या कुटुंबियांबद्दल म्हणावेसे वाटते.

# बबलू कराळे उपक्रमशील शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**ज्योतिर्मय साहित्य**

**अचलपूर** – राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा २०२४-२५ मध्ये जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अमरावतीने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मल्हारा, पंचायत समिती अचलपूर येथील आदर्श शिक्षक बबलू विनायकराव कराळे यांना नवोपक्रमशील शिक्षक पुरस्काराने, प्राचार्य डॉ. मिलिंद कुबडे, डॉ.शिंदे (अधिव्याख्याता डायट अमरावती) डॉ. राम सोनारे (अधिव्याख्याता डायट अमरावती) डॉ. दीपक चांदूरे ( अधिव्याख्याता डायग्राम अमरावती ) व इतर मान्यवरांच्या हस्ते नवोपक्रम पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.



त्यांनी सादर केलेल्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा मध्ये, जिल्हास्तरावर त्यांनी सादर केलेल्या नवोपक्रमासंबंधी. त्यांना मिळालेल्या तृतीय क्रमांक करिता बबलू कराळे यांना नवोपक्रम शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले गावचे सरपंच नारायणजी बोरेकार, गटशिक्षणाधिकारी राम चौधरी, केंद्र प्रमुख बोन्डे साहेब, मुख्याध्यापक शीला सोळंके, आदर्श शिक्षक श्रीकृष्ण उघडे, आदर्श शिक्षिका कल्पना चौधरी, आदर्श शिक्षिका किरण साकरकार, बबिता पंडित, आदर्श शिक्षक रतीराम मावस्कर, दिनकर राऊत, रश्मी पांनझाडे यांनी शुभेच्छा दिल्या. त्यानिमित्ताने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात आहे.

# शिवजयंती निमित्य कविसंमेलन संपन्न



**ज्योतिर्मय साहित्य**

**अमरावती** – सृजन साहित्य संघ शाखा अमरावती आयोजित शिवजयंती निमित्य छोटेखानी कविसंमेलनाचे आयोजन शिवमती कांचनताई उल्हे यांच्या पुढाकारातून नुकतेच शिवजयंतीच्या पर्वावर करण्यात आले होते. अतिशय रंगतदार झालेल्या या कविसंमेलनाला अनेक नामवंत साहित्यिकांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

कांचन रिसॉर्ट अमरावती येथे शिवजयंतीचे औचित्य साधून पार पडलेल्या या रंगतदार कविसंमेलनाचे अध्यक्ष जेष्ठ सिने. समीक्षक इंजि. वा. पा. जाधव तर प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ साहित्यिका प्राचार्या डॉ. शोभाताई रोकडे या होत्या. सृजन साहित्य संघ शाखा अमरावतीचे अध्यक्ष डॉ. श्यामसुंदर निकम तसेच सचिव दीपक दारव्हेकर मंचावर उपस्थित होते. कविसंमेलनाचे सूत्र संचालन कवि संदीप देशमुख यांनी केले. जेष्ठ वऱ्हाडी कवि खुशाल गुल्हाने, गजानन काकडे, विशाल मोहोड, विशाल कन्हेरकर, कांचनताई उल्हे, संजीवनीताई काळे यांनी आपापल्या दर्जेदार रचना सादर करून सभागृहातील वातावरण शिवमय करून टाकले.याप्रसंगी उत्कृष्ट कादंबरी लेखक विशाल मोहोड व कवयित्री संजीवनीताई काळे यांचा त्यांच्या साहित्यिक उपलब्धीसाठी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

***

# लहान मुलांना शिक्षणासाठी कुटुंबापासून दूर ठेवणे कितपत योग्य?

**ज्योतिर्मय साहित्य**

आपल्या आजूबाजूचे वातावरण मुलांच्या शैक्षणिक विकासास पूरक नाही,मुले पालकांचे ऐकत नाहीत ,मुलांना चांगले वळण व शिस्त नाही, जवळपास उत्तम शिक्षणाची सुविधा नाही. अशा अनेक कारणामुळे पालक आपल्या पाल्याला लहान वयातच निवासी शाळेत अथवा वसतिगृहात ठेवतात.जेणेकरुन त्याला चांगले शिक्षण मिळेल.त्याचे आयुष्य चांगले घडू शकेल. असा विचार या मागील असतो.परंतु कधीकधी अशा निर्णयामुळे मुलांच्या मनावर विपरित परिणाम होतो.ज्या हेतूने असा निर्णय घेतलेला असतो त्याच्या उलट घडलेले दिसून येते.

दहा अकरा वर्षाच्या लहान मुलांना आईवडील,बहिणभाऊ,घरातील अन्य नातेवाईक यांच्या समवेत राहण्यात सुरक्षित आणि आनंदी वाटते. कुटुंबाच्या बाहेर राहण्यात त्यांना असुरक्षित वाटते. त्यामुळे आईवडीलांना सोडून वसतिगृहात राहण्याची त्यांची मानसिक तयारी नसते.आणि जरी मुले बाहेर राहिली तरी त्यांची शैक्षणिक प्रगती होईल का याची खात्री नसते.कारण मुल जरी शरीराने बाहेर राहत असले तरी त्याचे मन आईवडील, कुटुंब यात गुंतलेले असते. अशा ठिकाणी राहण्यात त्याला आनंद वाटत नाही.ते मनातून निराश आणि खिन्न होते. आईवडीलांनी ठेवले म्हणून किंवा आईवडीलांच्या इच्छेखातर ते राहत असते. त्यामुळे असा निर्णय घेताना पालकांनी खूप विचारपूर्वक निर्णय घ्यावा. मुलांच्या आयुष्याला वळण देणारा हा निर्णय असतो. म्हणून आपल्या पाल्याचा मनाचा विचार करावा.. त्याला विश्वासात घ्यावे. त्यांच्याशी संवाद साधावा.त्याचे मन जाणून घ्यावे. त्याला विचार करण्यास वेळ द्यावा.जर त्याने आनंदी मनाने बाहेर राहण्यास होकार दिला तरच त्याच्या संमतीने असा निर्णय घ्यावा. अन्यथा असा निर्णय घेऊच नका. याला काही मुले अपवाद असू शकतील.



**विद्यार्थ्यांशी हितगुज**
**लक्ष्मण जगताप, बारामती**
**संपर्क : ९४२३२ ४९९९६**

मुले वयाने थोडी मोठी होतात त्यावेळी त्यांना समज यायला सुरूवात होते. शिक्षणासाठी बाहेर रहावे लागते हे त्यांना समजावून द्या. त्यांना स्वावलंबी बनायला मदत करा.त्यांना स्वतःची कामे करायची सवय लावा. त्यांची मनाची तयारी तरच बाहेर ठेवण्याचा निर्णय घेऊ शकता. अन्यथा असा निर्णय घेऊ नका.

हल्लीच्या काळात शिक्षणाबाबत पालक जागरुक आणि खूप दक्ष आहेत.अनेक सक्सेस मुलांच्या स्टो-या ऐकून आपल्या पाल्याबाबत असा प्रयोग करण्याचा प्रयत्न करतात.आणि त्यात स्वतः चे आणि पाल्याचे नुकसान करुन घेतात.

प्रत्येक मुलाची स्वभाववैशिष्टे वेगवेगळी असतात .ठराविक शाळेत किंवा ठराविक ठिकाणी ठेवल्यावरच आपल्या मुलाचे आयुष्य घडणार आहे हे प्रथम पालकांनी मनातून काढून टाकावे.

घरी राहूनही आपल्या परिसरातील शाळेत शिक्षण घेऊन आयुष्य उत्तम घडू शकते.यासाठी आपण मुलांना वेळ दिला पाहिजे.मुलांच्या अभ्यासातील अडचणी जाणून त्यांना मदत केली पाहिजे.शाळा आणि शिक्षकांशी नियमित संपर्क ठेवावा. शिक्षकांशी चर्चा करुन पाल्याच्या उणिवा व चांगल्या बाबी माहित करुन घ्याव्यात.आपल्या पाल्याचे मित्र -मैत्रिणी कोण आहेत त्यांच्या पाल्याच्या चांगल्या वाईट सवयी कोणत्या याकडेही बारकाईने लक्ष असायला हवे.

आपल्या घरातील वातावरण, मुलांची बुद्धिमत्ता, अध्ययनातील गोडी, मुलांनी मनापासून घेतलेली मेहनत, शाळा आणि शिक्षकांचे मार्गदर्शन, मित्र-मैत्रिणींचा सहवास, पालक म्हणून मुलांसाठी दिलेले संस्कार आणि वेळ या सगळ्यांच्या गोळाबेरीजेतून मुले आपल्या परिसरातूनच घडत असतात.




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559